९५७

जा.क्र.उपनि/एल विभाग/कलम ८३/सोलॅरिस नं.१ प्रिमा/ सन २०१८
उपनिबंधक संस्था एल विभाग, मुंबई , यांचे कार्यालय कक्ष
क्र.३११, तिसरा मजला, कोकण भवन, सीबीडी बेलापुर,
नवी मुंबई ४०० ६१४.

दिनांक :-२५/०१/२०१८.

वाचावे :-१.महाराष्ट्र सहकारी संस्था संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ मधील तरतुद.
२.महाराष्ट्र सहकारी संस्था संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ चे आदेश
जा.क्र.मुंबई/एल वि/सोलॅरिस नं.१ प्रिमा/क.८३/१७२५/सन २०१७ दि.०४.०८.२०१७.

ज्याअर्थी, सोलॅरिस नं.१ प्रिमायसेस को ऑप सोसायटी लिमिटेड, साकीविहार रोड, अंधेरी (पुर्व) मुंबई ४०० ०७२. ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये नोंदणीकृत सहकारी संस्था असुन संस्था असुन ती या कार्यालयाचे अधिकार कक्षेत येत आहे. आणि

ज्याअर्थी, उपरोक्त वाचावे क्र २ नुसार उक्त संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये श्री.एम एन कोरडे १ ले अप्पर विशेष लेखापरिक्षक वर्ग-२ सहकारी संस्था मुंबई यांनी उक्त संस्थेच्या सन २०१०-११ ते.२०१४-१५ या कालावधीच्या लेखापरिक्षण अहवालात संस्थेच्या माजी समिती सदस्यांकडुन कायदा, नियम व उपविधीतील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे तसेच संस्थेच्या मालमत्तेचे तसेच संस्थेच्या सभासदांचे हित विचारात न घेता संस्थेचे आर्थिक नुकसान झालेले असल्याचे निदर्शनास आणुन दिलेले असल्यसाने वाचावे क्र २ नुसार उक्त लेखापरिक्षण अहवालातील मुदयांची चौकशी करण्यासाठी अधिनियमाचे कलम ८३ अन्वये श्री.संतोष ठुबे, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि (परसेवा) यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यांत आलेली होती. तथापी सदरच्या चौकशीसाठी रु.१०,०००/- चौकशी फी मान्य करण्यांत आलेली होती आणि

ज्याअर्थी, उपरोक्त संस्थेबाबत श्रीमती निरा सिंग यांचे मेन्टैन्न्स आकारणी बाबतही या कार्यालयास तक्रार प्राप्त झालेली आहे. सदर तक्रारीतील मुदयांचे देखील वाचावे क्र २ च्या आदेशात समाविष्ट करणे आवश्यक झालेले आहे. तसेच यापुर्वीच्या आदेशात मंजुर केलेली चौकशी फी व नव्याने समाविष्ट करण्यांत येणारे मुदयांकरीता वाढीव चौकशी फी मंजुर करणे क्रम प्राप्त झालेले असल्याने या बाबत सुधारीत आदेश निर्गमित करण्यांत येत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मी शिरीष सपकाळ, उपनिबंधक सहकारी संस्था एल विभाग मुंबई, सोलॅरिस नं.१ प्रिमायसेस को ऑप सोसायटी लिमिटेड, साकीविहार रोड, अंधेरी (पुर्व) मुंबई ४०० ०७२. या संस्थेच्या दि.०४.००८.२०१७ रोजीचे आदेशात नमुद केलेले चौकशी अधिकारी यांचे मानधन रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा रुपये मात्र ) ऐवजी रु.२०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार मात्र) करण्यांत येत असुन सदर आदेशात श्रीमती निरा सिंग यांचे तक्रारीतील मुदयांचा समावेश करण्यांत येत आहे. (सोबत प्रत जोडण्यांत येत आहे)

सदरचा आदेश आज दि. ...०१.२०१८ रोजी माझे सही व या कार्यालयाचे मुद्रेसह दिला असे.

(शिरीष सपकाळ )
उपनिबंधक
सहकारी संस्था एल विभाग, मुंबई

Scanned by CamScanner